# ‘एनआयए’ने तपास पूर्ण झाल्यावर सर्वांसमोर बोलावं ; विनाकारण बातम्या पसरवू नये -जयंत पाटील


साप्ताहिक दर्शक

E-mail : weeklydarshak.gmail.com R.N.I.NO.MAH/MAR/2000/02266

वर्ष ३६ अंक ३१ सोमवार दि.१५ मार्च ते रविवार २१ मार्च २०२१ किंमत रु.२




## पाण्याच्या बाहेर असल्यावर माशाची जशी तडफड होते त्याप्रमाणे नारायण राणे यांची अवस्था ; विरोधी पक्षात बसण्याची सवय फडणवीसांनी अंगवळणी पाडून घेतली पाहिजे - जयंत पाटील

अंबानींच्या घराजवळ सापडलेल्या स्फोटकं प्रकरणाचा तपास करणाऱ्या एनआयएकडून तपास सुरू आहे. सचिन वाझे यांना अटक केल्यानंतर या संदर्भातील वेगवेगळ्या बातम्या समोर येताना दिसत आहे. त्यावरून राज्याचे जलसंधारण मंत्री आणि राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी एनआयएला सल्ला दिला आहे. “सापडलेली स्फोटके आणि सचिन वाझे यांच्या चौकशीबाबत एनआयएने निष्कर्षाप्रत पोहोचल्या नंतरच बोलावे. दररोज विनाकारण बातम्या पसरवू नयेत,” असं जयंत पाटील यांनी म्हटलं आहे.जयंत पाटील यांनी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत एनआयएच्या तपासावर भूमिका मांडली. “या सगळ्यामुळे तपास प्रक्रियेविषयी काहीच माहिती नसलेल्या समाजातील लोकांपर्यंत चुकीचा संदेश जातो. त्यामुळे एनआयएने प्रथम संपूर्ण तपास पूर्ण करावा. या प्रकरणाचा संपूर्ण छडा लागला की अधिकृतपणे सर्वांसमोर येऊन बोलावे. केंद्रीय यंत्रणांनी तपास जरुर करावा. मात्र, वर्तमान पत्रांमध्ये अमक्याने हे केलं, ते केलं, अशा बातम्या सोडू नयेत. या सगळ्या जेव्हा पुराव्याआधारे ‘एनआयए’ने निष्कर्ष जाहीर केल्यानंतर राज्य सरकार संबंधित दोषी व्यक्तींवर कारवाई करायला तयार आहे,”असं पाटील म्हणाले.नारायण राणे यांच्यावरही जयंत पाटील यांनी टीका केली. “पाण्याच्या बाहेर असल्यावर माशाची जशी तडफड होते त्याप्रमाणे नारायण राणे यांची अवस्था झाली आहे. नारायण राणे यांना पुन्हा कधी सत्तेत जाऊन बसतो, असं झालं आहे. त्यामुळे काहीही झालं की ते राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी करता. हाच न्याय लावायचा झाल्यास प्रथम उत्तर प्रदेश आणि गुजरातमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करावी लागेल,” असं म्हणत पाटील यांनी नारायण राणेंना प्रत्युत्तर दिलं.यावेळी जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली. “राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आल्यापासून भाजपाचे नेते सातत्याने सरकार पडणार, असं म्हणत आहेत. या अधिवेशनात भाजपा पहिल्यांदाच विरोधी पक्षाप्रमाणे वागताना दिसला. देवेंद्र फडणवीस यांना खात्री झाली आहे की, आपल्याला पुढील साडेतीन वर्षे विरोधी पक्षातच बसायचे आहे. त्यानुसार त्यांनी अधिवेशनात विरोधी पक्षनेत्याची भूमिका पार पाडली. हे त्यांनी नेहमी करावं, विरोधी पक्षात बसण्याची सवय फडणवीसांनी अंगवळणी पाडून घेतली पाहिजे,” असा टोला जयंत पाटील यांनी लगावला.






## अहमदनगर शहरात दहा ठिकाणी मायक्रो कंटेन्मेंट झोन

अहमदनगर - कोरोनाचे वाढते रूग्ण लक्षात घेऊन आणखी प्रसार होऊ नये म्हणून महापालिकेने पावले उचलली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नगर शहरात दहा ठिकाणी मायक्रो कंटेन्मेंट झोन केले आहेत. ‘कोरोना-2’ची सुरूवात मार्चमध्ये मोठ्या प्रमाणात कहर करण्यास सुरूवात केली असून, रूग्णांमध्ये प्रतिदिन मोठी वाढ होत आहे. नगर शहरासह जिल्ह्यात या वाढीचा सीलसिला सुरूच आहे. तसेच सरासरी दोन मृत्यू यामुळे होत असल्याने प्रशासन दक्ष झाले आहे. नगर शहरात रूग्णांची संख्या वाढत असल्याने महापालिका आयुक्त शंकर गोरे यांनी उपाययोजनेचा एक भाग म्हणून जास्त रूग्ण असलेला परिसर सील करण्यास सुरूवात केली आहे. यावेळी कंटेन्मेंट झोन निश्चित करताना त्याची व्याप्ती कमी केली आहे. तसेच झोनबाहेर पूर्वी असलेला बफर झोन रद्द करण्यात आला आहे. ठराविक घरातील लोकांनाच ये-



जा करण्यास बंधने असल्याने त्याचे नियमन करणेही यामुळे सोपे जात आहे. नगर शहरात आतापर्यंत बोल्हेगाव परिसरात तीन ठिकाणी, तसेच आर्यन सोसायटी (बालिकाश्रम रस्ता), सिव्हील हडको, कोहिनूर मंगल कार्यालयासमोरी जयश्री कॉलनी, माणिकनगर, निलायम सोसायटी, सारसनगर-चिपाडे मळा आणि केडगाव या दहा ठिकाणी मायक्रो कंटेन्मेंट झोन केले आहेत. आर्यन सोसायटीमध्ये पाच विंग्ज आहेत. त्यातील बी आणि सी या दोन विंग्ज सील करण्यात आल्या आहेत. इतर ठिकाणी ये-जा करण्यासाठी बंधने नाहीत. तसेच ज्या घरामध्ये रूग्ण आढळलेले आहेत, त्या घराच्या आसपास असलेले चाप-पाच घरांचा समावेश कंटेन्मेंट झोनमध्ये करण्यात येत आहे. संबंधित ठिकाणी बॅरिकेट, बांबू लावून त्यांच्याकडे जाण्याचा रस्ता बंद करण्यात आला आहे. तसेच तेथे महापालिका कर्मचारी आणि पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## संपामुळे बँकांचे कामकाज विस्कळीत




युनाइटेड फोरम ऑफ बँक युनिअन्स ने बँकांच्या खाजगीकरण विरोधात दोन दिवसांच्या संपाच्या आवाहनाला अहमदनगर शहरात शांततेत निषेध कार्यक्रम यशस्वी पणे पार पडल्यावर 16 मार्च 2021 रोजी सर्व कर्मचारी व अधिकारी यांनी दुसऱ्या दिवशीही शांततेच्या मार्गाने निदर्शने केली. मंगळवारी दिल्ली गेट व चितळे रास्ता या ठिकाणी निदर्शने केली.सरकार बँकांचे खाजगीकरण करण्यावर ठाम असून सार्वजनिक बँकांच्या राष्ट्रीयी करणांच्या उद्दिष्टांची पायमल्ली करीत आहे. याचा निषेध या प्रसंगी करण्यात आला. भारतातील बँकिंगचा इतिहास पाहता दिसून येते कि बँक राष्ट्रीयीकरणानंतर अनेक खाजगी बँका बुडीत निघाल्या व त्यांचे सार्वजनिक बँकेत विलीनीकरण करण्यात येऊन सामान्य खातेदारांच्या ठेवी सुरक्षित ठेवण्यात आल्या. अद्याप देशात काही बँका डबघाईस आलेल्या असून त्यांच्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळने दुरापास्त झाले आहे. हीच परिस्थिती बँकांच्या खाजगीकरणानंतर बँकांचे हस्तांतरण मोठ्या कारखानदार / उद्योगपतींकडे झाल्यावर निर्माण होण्याची भीती असल्याचे सांगण्यात आले. संपामध्ये कॉम. उल्हास देसाई, कॉम. उमाकांत कुलकर्णी, कॉम माणिक अडाणे, कॉम. सुजय नाले, कॉम सुजित उदरभारे, कॉम अमोल बर्वे, कॉम आशुतोष काळे, कॉम. राघवेंद्र, कॉम. संदीप फंड, कॉम. भलगट, कॉम. शोभा देशपांडे, कॉम. आशा राशीनकर, कॉम. सायली शिंदे, कॉम. सीमा बोकील, कॉम. सुमित खरबीकर, कॉम. विशाल खोबने, कॉम. विजेंद्र सिंग, कॉम. अजित बर्डे, कॉम. सुनील जगदाळे, कॉम. सुनील घोंगडे, कॉम. संतोष चौधरी, कॉम. प्रकाश कोटा, कॉम. गजानन पांडे, कॉम. मोईन शेख, कॉम. शंतनू सोनावणे, सोम. सचिन बोठे आदी सहभागी झाले होते.

## महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीमध्ये अहमदनगर शहर जिल्हा काँग्रेसची आढावा बैठक संपन्न

अहमदनगर : अहमदनगर शहर जिल्हा काँग्रेसची संघटनात्मक आढावा बैठक महसूल मंत्री ना. बाळासाहेब थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संगमनेर कारखान्याच्या विश्रामगृह येथे पार पडली. आ.डॉ. सुधीर तांबे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत शहर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरणभाऊ काळे यांनी शहरातील पक्षाच्या संघटनात्मक कामांची माहिती दिली. यावेळी अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली.शहर जिल्हा उपाध्यक्ष खलील सय्यद, निजाम जहागीरदार, अनंतराव गारदे, रियाज शेख, फारुख शेख, युवक काँग्रेस अध्यक्ष अक्षय कुलट, क्रीडा विभाग शहर जिल्हाध्यक्ष प्रवीण गीते आदी यावेळी बैठकीला उपस्थित होते.

किरण काळे यांनी बैठकीमध्ये शहरात काँग्रेस बळकटीकरण सप्ताहात घेण्यात आलेले विविध कार्यक्रम, नेहरू पुतळा होर्डिंग विषय, शहरात झालेले पक्ष प्रवेश, एमपीएससी विद्यार्थ्यांसाठी पक्षाने काढलेला मोर्चा आदीं बद्दल माहिती दिली. पक्ष विस्तारासाठी शहरामध्ये पुढील सहा महिन्यांसाठी हाती घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमां बद्दल यावेळी चर्चा करण्यात आली. पक्ष विस्ताराच्या दृष्टीने ना. थोरात यांनी यावेळी मार्गदर्शन केले. जिल्हा बँकेच्या निवडणूकीच्या अनुषंगाने ना. बाळासाहेब थोरात यांचा दोन वेळा नगर दौरा झाला होता. मात्र लवकरच पुन्हा शहराच्या



दौऱ्यावर ते येणार आहेत. यावेळी पक्षाचे विविध कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे किरण काळे यांनी सांगितले आहे.आढावा बैठकीत ना. थोरात यांनी काळे यांच्या कामाचे कौतुक केले. काळे यांच्या नेतृत्वाखाली नगर शहरात काँग्रेसला उज्वल भवितव्य असल्याचे यावेळी ते म्हणाले.

दौऱ्यात शहर काँग्रेससाठी ना.थोरात स्वतंत्र वेळ देणार असल्यामुळे किरण काळे यांना पक्षवाढीसाठी शहरामध्ये विशेष बळ दिले जाणार आहे. फारुख शेख यांनी मनपामध्ये सध्या सुरू असणाऱ्या राजकीय घडामोडींची माहिती बैठकीत ना. बाळासाहेब थोरात यांना दिली. किरण काळे यांच्या नेतृत्वाखाली मनपाध्ये आम्ही सक्षम विरोधी पक्ष म्हणून नागरिकांच्या प्रश्नांसाठी आवाज उठविण्याची भूमिका घेतली असल्याचे यावेळी शेख यांनी सांगितले. सत्तेपेक्षा लोकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीला प्राधान्य देण्याच्या सूचना यावेळी ना. थोरात यांनी बैठकीमध्ये पदाधिकाऱ्यांना केल्या.

# विनामास्क फिरणाऱ्यांवर जिल्हा प्रशासन आणि पोलीसांची कारवाई

अहमदनगर : कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. राजेन्द्र भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक मनोज पाटील आणि महानगरपालिका आयुक्त शंकर गोरे थेट रस्त्यावर उतरले. विनामास्क फिराणाऱ्या आणि प्रवास करणाऱ्या नागरिकांवर आणि शासकीय कार्यालयात विनामास्क वावरणाऱ्या कर्मचाऱ्यांवर थेट दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. शहरात गेल्या काही दिवसांपासून कोरोना संसर्ग वाढत आहे. बेजबाबदार नागरिकांमुळे जिल्ह्याचे आरोग्य धोक्यात येत असून अशा नागरिकांवर दंडाची कारवाई करण्यात आली.

ज्या दुकानात विनामास्क नागरिक आढळून येतील, अशा दुकानांवर महिनाभर बंदी घालण्याचा विचार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. भोसले यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी डॉ. भोसले यांनी आज कोरोना विषयक परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा पोलीस प्रमुख मनोज पाटील, मनपा आयुक्त शंकर गोरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुनील पोखरणा, निवासी उपजिल्हाधिकारी संदीप निचित, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संदीप सांगळे, जिल्हा सर्वेक्षण अधिकारी डॉ. दादासाहेब साळुंखे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. वीरेंद्र बडदे आदींची यावेळी उपस्थिती होती.

त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. भोसल आणि जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. पाटील यांनी थेट भिंगारवाला चौक गाठला. तेथील दुकानांत तसेच रस्त्याने विनामास्क फिरणार्या नागरिकांना फटकारले आणि नियमांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या. ज्या व्यक्ती विनामास्क फिरत असल्याचे निदर्शनास आले त्यांच्याकडून दंड वसूल करण्याचे निर्देश त्यांनी पोलिसांना दिले. तेथून अचानक जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस प्रमुख थेट पुण्याकडे जाणार्या बसेस थांबतात, त्या स्वस्तिक स्टॅन्ड येथे दाखल झाले. तेथे आलेल्या शिवशाही बसमध्ये असणाऱ्या विनामास्क प्रवाशास इतरांच्या आरोग्यास धोका निर्माण करण्याबद्दल फटकारले आणि त्यांना दंड भरण्यास सांगितले. तेथे आलेल्या इतर बसेसचीही तपासणी करण्यात आली. नागरिकांनाही त्यांनी आवाहन करुन, कोरोना संसर्ग रोखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. केवळ दंड भरला म्हणजे जबाबदारी संपत नाही, तर प्रत्येकाने स्वताबरोबरच इतरांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

काही दिवसांपूर्वीच जिल्हाधिकारी डॉ. भोसले यांनी. शासकीय कार्यालयात 'मास्क नाहीप्रवेश नाही' अशी मोहिम राबविण्याच निर्देश दिले होते. मात्र, आज अचानक त्यांनी पोलीस अधीक्षकांसह जिल्हा परिषदेला भेट दिली. त्यावेळी तेथे विनामास्क आढळलेल्या कर्मचार्यांवर कारवाई करण्यात आली. तेथून थेट



त्यांनी पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालय गाठले आणि समोर असलेल्या इमारतीतील कार्यालयांना भेट दिली. यावेळी काही कर्मचारी विनामास्क आढळून आल्याने त्यांना दंड ठोठावण्यात आला. सध्या कोरोना संसर्ग वाढत असून नागरिकांनी स्वताच्या आरोग्याबरोबरच इतरांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. मात्र, काही नागरिक नियमांचे पालन करताना दिसून येत नाहीत. त्यामुळे नागरिकांनी नियमांचे पालन केले नाही, तर जिल्हावासियांसाठी कठोर निर्णय घ्यावे लागतील, असे त्यांनी स्पष्टपणे बजावले. शहरातील काही दुकानांत दुकानमालक तसेच कर्मचारी विनामास्क असल्याचे दिसतात. तर दुकानात जाणारे काही नागरिकही विनामास्क आढळून येत आहेत.

यापुढे असे प्रकार घडल्यास संबंधित दुकान पुढील महिनाभर बंद ठेवण्याची कारवाई करण्याचा विचार सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. कारण, केवळ दंड वसूल करणे हे उद्दिष्ट नसून वाढत्या कोरोना संसर्गाला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि सर्व यंत्रणा कार्यरत असल्याचे ते म्हणाले. दरम्यान, जिल्हा पोलीस प्रमुख श्री. पाटील म्हणाले, पोलिसांनी ज्या ठिकाणी लग्न समारंभ होत आहेत, अशा मंगल कार्यालयांना भेटी देऊन ज्याठिकाणी नियमांचे उल्लंघन होत आहे, अशा ठिकाणी दंडात्मक कारवाई केली आहे.

## रेखा जरे खून प्रकरणातील मुख्य सूत्रधार बाळ बोठे अखेर पोलिसांच्या हाती

### हैद्राबाद मध्ये वेषांतर करून राहत होता



अहमदनगर (प्रतिनिधी) : यशस्विनी महिला ब्रिगेडच्या अध्यक्षा आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्या रेखा जरे खून प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि मागील तीन महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या बाळ बोठेला अखेर पोलिसांच्या हाती लागला. शनिवारी पहाटे बोठे याला पोलिसांनी हैदराबादेत बेड्या ठोकल्या आहेत. मागील काही महिन्यांपासून पोलीस बोठेच्या मागावर होते. पाच दिवसांपासून पोलिसांची सहा पथकं बोठेच्या हालचालींवर लक्ष ठेवून होती. महत्त्वाचं म्हणजे पोलिसांना माहिती होऊ नये म्हणून हॉटेलमधील रुमचा दरवाजा बाहेरून बंद करण्यात आला होता. अखेर शनिवारी पहाटे बोठे याला पोलिसांनी हैदराबादेत बेड्या ठोकल्या, अशी माहिती अहमदनगर पोलिसांनी दिली आहे. त्यानंतर पोलिसांनी भिंगारदिवे याला अटक केली होती. तर बोठे मात्र फरार झाला होता. फरार होताना त्याने त्याचे दोन्ही मोबाइल घरीच ठेवले होते. पोलिसांनी हे मोबाइल जप्त केलेले आहेत. तसेच बोठे याच्या शोधासाठी विविध ठिकाणी पाच पोलीस पथक रवाना करण्यात आलेली होती. तपासी अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक अजित पाटील व गुन्हे शाखेच्या पथकाने शहरातील बालिकाश्रम रस्त्यावरील बोठे याच्या बंगल्याची झडतीही घेतली होती. झडतीत पोलिसांना बोठे याचे रिव्हॉल्वर मिळून आले होते. बोठे याच्याकडे शस्त्रपरवाना असल्याचं तसेच तपासात महत्त्वपूर्ण ठरतील अशा काही वस्तूही मिळून आल्या होत्या.बोठे याला अटक करण्यासाठी मुंबई, सोलापूरसह हैदराबाद पोलिसांची मदत अहमदनगर पोलिसांनी घेतली होती. बोठे हैदराबादमध्ये असल्याचे माहिती झाल्यानंतर पोलिसांनी शोध घेण्यास सुरूवात केली. मात्र, याची माहिती मिळाल्याने आरोपी बोठे काही मिनिटांच्या अंतराने पोलिसांना गुंगारा देत होता. अखेर पोलिसांनी शिताफीने त्याला पकडले, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे बाळ बोठे हा हैद्राबाद मध्ये वेषांतर करून राहत होता. तेथील एका हॉटेल मधल्या रुम नंबर १०९ मध्ये बी. जे. बी या नावाने तो राहत होता . या रुमला पुढून कुलूप लावलेले असून मागच्या दाराने तो ये-जा करत असे. बाळ बोठे सह त्याच्या तीन सहकाऱ्यांना देखील अटक करण्यात आली आहे. त्यांचे नावे पुढील प्रमाणे - १) बाळ जगन्नाथ बोठे रा. बालीकाश्रम रोड कमलनयन हॉस्पिटल समोर , २) राजशेखर अजय चाकाली वय २५ रा, गुड्डुर करीमनगर मुस्ताबाद आंध्रप्रदेश तेलंगणा ३) शेख इस्माईल शेख आली वय 30 वर्षे राहणार खुबा कॉलनी शाईन नगर बालापुर सुरुरनगर रंगारेड्डी आंध्रप्रदेश तेलंगणा, ४)अब्दुल रहमान अब्दुल आरिफ वय 52 वर्षे राहणार चारमिनार मज्जित पहाडी शरीफ सुरूर नगर रंगा रेड्डी हैद्राबाद आंध्रप्रदेश ५) महेश वसंतराव तनपुरे वय 40 वर्षे धंदा व्यवसाय राहणार कुलस्वामिनी गजानन हाउसिंग सोसायटी नवलेनगर गुलमोहर रोड सावेडी अहमदनगर ६) जनार्दन अकुले चंद्रप्पा राहणार 14 -113 फ्लॅट नंबर 301 त्रिवेणी निवास रामनगर पी अँण्ड टी कॉलनी सारोमानगर रंगारेड्डी हैदराबाद तेलंगणा यांना अटक करण्यात आली असून पी. अनंतलक्ष्मी व्यंकटम सुब्बाचारी रा हेंद्राबाद तेलंगणा फरार आहे. महेश वसंत तनपुरे यास नगरमध्येच अटक करण्यात आली असून पैकी राजशेखर चाकाली शेख इस्माईल शेख आणि अब्दुल रहमान अब्दुल आरिफ यांना पारनेर न्यायालयात हजार करण्यात आलं असून त्यांना १६ मार्च पर्यंत पोलीस कस्टडी देण्यात आली आहे. नगर क्राईम ब्रांचच्या पथकाने ५ दिवसांच् ऑपरेशन करून औरंगाबाद पोलीस हैदराबाद पोलीस कमिश्नर यांच्या मदतीने आणि शेवटचे २४ तास तर न झोपता कारवाई करून या आरोपींना अटक करण्यात आली या मध्ये सोलापूर मुंबई क्राईम ब्रांच सायबर टेक्निकल अनालिसिस च्या आधारे केलेल्या विशलेषणामुळे या कारवाईला यश आले. या कारवाईत पोलीस अधीक्षक मनोज पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील नगर ग्रामीण विभागाचे अनिल कटके , कर्जत पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक यादव , संभाजी गायकवाड, महिला पोलीस निरीक्षक गडकरी , सहाय्यक पोलीस निरीक्षक सानप , मिथुन घुगे , दिवटे, समाधान सोळंखे , पो हे कॉ रवींद्र पांडे , पोना रविकिरण सोनटक्के , दीपक शिंदे , राहुल गुंडू , अभिजित अरकल, महिला पोना जयश्री फुंदे , पोना संतोष लोंढे , गणेश धुमाळ , भुजंग बडे, पोकॉ सचिन वीर , सत्यम शिंदे , चौघुले, मिसाळ , सानप , रणजित जाधव , बुगे , जाधव , चापोकॉ जाधव , दातीर , पोकॉ प्रकाश वाघ चापोना राहुल डोळसे , चापोकॉ रितेश वेताळ, आदींनी हि कारवाई केली.

## महावितरण कंपनीचे खाजगीकरण करण्याचा केंद्राचा डाव : तनपुरे

राहुरी : महावितरण कंपनीचे खाजगीकरण करण्याचा केंद्राचा डाव असल्याने भविष्यामध्ये अदानी- अंबानी यांच्याकडे कंपनी गेल्यास शेतकऱ्यांना मोठ्या संकटाला सामोरं जावं लागेल असा आरोप राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी केला आहे.ब्राह्मणी येथे एका कार्यक्रमात ते बोलत होते . ते म्हणाले की , यामुळे शेतकरी हितासाठी काही कटु निर्णय घ्यावे लागत आहेत . राज्यात महावितरण कंपनीची ६० हजार कोटी थकबाकी आहे . यावेळी ना तनपुरे म्हणाले की , राहुरी तालुक्यातील चेडगाव पूर्ण होणारा जिल्ह्यातील पहिला लिंक फिडर असून भागातील शेतकऱ्यांना गेल्या ४ ते ५ वर्षापासून मुळा उेवा कालव्याचे आवर्तन सुटले की या भागातील शेतकऱ्यांना वारंवार विजेचा होणारा त्रास लक्षात घेता महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सदर काम पंडित दिन यावर कायम स्वरूपी उपाय योजना करण्याबाबत घेऊन १ ९ लाख रुपये खर्चाच्या साडे तीन



किलोमीटर दयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजनेतुन काम हाती अंतराच्या लिंक फिडरचे काम अवघ्या १५ दिवसातझाले आहे . त्या फिडरचे लोकार्पण ब्राह्मणी येथील उपकेंद्रातील ऊर्जा राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांचे हस्ते झाले . यामुळे चेडगाव भागातील शेतकऱ्यांचा पाट पाण्याची वेळी होणारा त्रास कायम स्वरूपी मार्गी लागला आहे. ब्राह्मणी उपकेंद्रात बसविलेल्या लिंक फिडरचे उदघाटन प्रसंगी अध्यक्ष- स्थानी बाजार समितीचे माजी संचालक नामदेवराव म्हसे होते . यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भिटे , हावितरणचे उपअभियंता धिरजकुमार गायकवाड , डॉ राजेंद्र बानकर , केशव बेरड , चेडगावचे सरपंच संजय खरात , नितीन बाफना , सोमनाथ हापसे , बाळासाहेब शेळके आदि उपस्थित होते. चेडगाव ग्रामपंचायत येथे एकलव्य जयंतीनिमित्त आयोजित कलेल्या कार्यक्रम प्रसंगी सरपंच संजय खरात यांनी कार्यकर्त्यांची बैठक घेऊन प्रश्न मांडले.




## एमपीएससी परीक्षा २१ मार्चला घेण्याच्या निर्णयाचे अहमदनगर काँग्रेसकडून स्वागत

अहमदनगर : एमपीएससीने अचानकपणे कोणतीही पूर्वकल्पना न देता एमपी एससीच्या परीक्षा रद्द करण्याच्या केलेल्या घोषणेमुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणार्या विद्यार्थ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला होता. अहमदनगर शहर जिल्हा विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने काल या संदर्भामध्ये किरण काळे यांच्या नेतृत्वाखाली मोठा विद्यार्थी मोर्चा काढण्यात आला होता. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सत्यजितदादा तांबे यांनी या बाबतीमध्ये आक्रमक भूमिका घेत सरकारला या निर्णयाबद्दल फेरविचार करण्याचे आवाहन केले होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले, महसूल मंत्री ना. बाळासाहेब थोरात यांनी देखील मुख्यमंत्र्यांशी चर्चा करत हा निर्णय बदलावा या संदर्भामध्ये मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली होती. काँग्रेसच्या मागणीला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून २१ तारखेला परीक्षा घेण्यात येतील असे जाहीर केले आहे. मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयाचे अहमदनगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी स्वागत केले आहे. काळे म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या या भूमिकेमुळे स्पर्धापरीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. विद्यार्थ्यांनी आता कोणत्याही संभ्रमात न राहता तयारीसाठी मिळालेल्या अधिकच्या दिवसांचा सुयोग्य नियोजन करत चांगला अभ्यास करावा आणि परीक्षांना सकारात्मक वातावरणामध्ये सामोरे जावे. विद्यार्थी नेते उत्कर्ष झावरे म्हणाले की, विद्यार्थी काँग्रेस ही विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कासाठी नेहमीच रस्त्यावर उतरत असते. स्पर्धा परीक्षार्थींच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत. जाहिद शेख म्हणाले की, स्पर्धा परीक्षार्थींनी परीक्षेला सामोरे जाताना कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास आमच्याशी संपर्क साधावा. प्रशांत जाधव यांनी आवाहन केले आहे की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मुलांनी मास्क, सॅनिटायझरचा वापर करून स्वतःची काळजी घेत परीक्षेला सामोरे जावे.

साप्ताहिक दर्शक
हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशन,संस्थापक संपादक शेख रियाजोद्दीन फजलोद्दीन यांनी दर्शकभवन,७२६,सरोष प्रिंटर्स,दिपाली थिएटर समोर,झेंडीगेट रोड,अहमदनगर ४१४००१ महाराष्ट्र येथे मुद्रीत करून येथेच प्रकाशित केले.बातम्यांची जबाबदारी कार्य.संपादक शेख आदिल रियाजोद्दीन यांच्यावर राहील मो.९७६३०३०३८६, ७६६६६०२६६० (अहमदनगर न्यायकक्षेत)

# अहमदनगर-पुणे शटल रेल्वे मागणीसाठी रेल्वे रोको आंदोलन ;पोलिसांनी अडविले



अहमदनगर जिल्ह्याच्या दृष्टीकोनाने जिव्हाळ्याचा प्रश्न बनलेल्या अहमदनगर ते पुणे शटल रेल्वे सेवा सुरु करण्याच्या मागणीसाठी अहमदनगर जिल्हा प्रवासी संघटना, विविध स्वयंसेवी संघटना, राजकीय पुढारी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने अहमदनगर रेल्वे स्थानक येथे रेल्वे रोको आंदोलनाचा प्रयत्न करण्यात आला. बंदोबस्तासाठी उपस्थित असलेल्या पोलीसांच्या फौजफाट्याने आंदोलकांना प्रवेशद्वारतच अडवले. यावेळी आंदोलकांनी जोरदार निदर्शने केली. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप म्हणाले की,नगर-पुणे इंटरसिटी रेल्वे गरजेची गोष्ट बनली असून, हा संपुर्ण जिल्ह्याचा प्रश्न आहे. यामुळे प्रवाश्यांचा वेळ वाचून शहराचा देखील विकास साधला जाणार आहे. नगरमधून पुण्याला जाणार्यांची संख्या जास्त आहे. रस्त्याने जाताना मोठा वेळ व पैसा खर्च होऊन देखील अपघात होण्याचा धोका असतो. या रेल्वे सेवेमुळे काही वेळेतच पुण्याला सुरक्षितपणे जाता येणार आहे. या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी दिल्ली येथे जाऊन रेल्वे मंत्री व रेल्वे अधिकार्यांची भेट घेऊ. तरी देखील प्रश्न न सुटल्यास थेट दिल्लीला आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला. हरजितसिंह वधवा यांनी मोठ्या संख्येने युवक शिक्षण व रोजगारासाठी पुण्याला जात आहे. रस्त्याने अपघात, प्रदुषण व वाहतुक कोंडी धोका भेडसावत असतो. ही रेल्वे सेवा सुरु झाल्यास सर्वसामान्य नागरिकांना परवडणार असून, शहराचा देखील विकास होणार असल्याचे सांगितले.तर येत्या तीन महिन्यात ही रेल्वे सेवा सुरु न झाल्यास कोणत्याही प्रकार पुर्वसुचना न देता रेल्वे रोको आंदोलन करण्याचा त्यांनी इशारा दिला. अर्शद शेख म्हणाले की, कॉडलाईन व विद्युतीकरणाचे काम पुर्ण झाले असताना देखील ही सेवा प्रलंबीत ठेवण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाच्या इच्छाशक्ती अभावी नगर-पुणे इंटरसिटी रेल्वे सेवा रखडली आहे. जनआंदोलनाच्या रेट्याने ही सेवा कार्यान्वीत करावी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.अॅड. कारभारी गवळी यांनी नगर शहर विकसीत होऊन ड्रिमसिटी होण्यासाठी अहमदनगर ते पुणे शटल रेल्वे सेवा महत्त्वाची ठरणार आहे. इतर मोठ्या शहरात बुलेट ट्रेन सुरु करण्यापेक्षा नागरिकांच्या सोयीसाठी रेल्वे सेवा सुरु करण्याची गरज आहे. केंद्र सरकार व रेल्वे विभागाचा कारभार टंगळमंगळ व अनागोंदी असल्याचा त्यांनी आरोप केला. सुहास मुळे यांनी ही रेल्वे सेवा सुरु करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरु राहणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच यावेळी विविध संघटनेच्या प्रमुख पदाधिकार्यांची भाषणे झाली. या आंदोलनाची दखल घेत अहमदनगर रेल्वे स्टेशनचे प्रभारी मॅनेजर श्रीकांत परेडा यांनी आंदोलकांना लेखी पत्र दिले. मात्र अहमदनगर ते पुणे शटल रेल्वे सेवा सुरु होण्याबाबत ठोस ओशासन नसल्याने ते पत्र न स्विकारता आंदोलन सुरु ठेवण्यात आले. वधवा यांनी सोलापूर व पुणे रेल्वे विभागात चर्चा झाली असून, रात्री वरिष्ठ वाणिज्य अधिकारी सोलापूर विभाग यांनी व्हॉट्सअपवर टाकलेल्या ओशासनाचे लेखी पत्र देण्याची मागणी केली.त्यानंतर प्रभारी मॅनेजर परेडा यांनी नगर पासून पुणे येथे शटल रेल्वे सेवा सुरु करण्यास प्राधान्य देत आहोत. कोरोनामुळे राज्य सरकारची सर्वांसाठी खुली परवानगी नसल्याने ही सेवा कार्यान्वीत करण्यास काही काळावधी देण्याची विनंती करुन आंदोलन स्थगित करण्याचे लेखी पत्रात स्पष्ट केल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. तर आमदार जगताप यांनी सदर रेल्वे सेवा सुरु होण्यासाठी राज्य सरकारकडे लागणारी परवानगीसाठी पाठपुरावा करण्याचे यावेळी ओशासन दिले. या आंदोलनात पीपल्स हेल्पलाईन, भारतीय जनसंसद, जागृक नागरिक मंच, हर दिन मॉर्निंग ग्रुप, पीस फाउंडेशन, फिनिक्स फाउंडेशन अनेक स्वयंसेवी संघटना सहभागी झाल्या होत्या. या आंदोलनात आमदार संग्राम जगताप यांनी सहभागी होऊन पाठिंबा दिला. यामध्ये हरजितसिंह वधवा, अर्शद शेख,कारभारी गवळी,संजय सपकाळ, मन्सूर शेख, नगरसेवक विनीत पाऊलबुध्दे, बाळासाहेब पवार, विजय गव्हाळे, संभाजी पवार, बहिरनाथ वाकळे, अशोक कानडे, जालिंदर बोरुडे, सुहास मुळे, विपुल शहा, सुनिल छाजेड, संजय वाळुंज, संतोष बडे, सुभाषलांडे, अशोक सब्बन, सुनिल छाजेड, प्रकाश भंडारे, अभिजीत सपकाळ, रमेश वराडे, दिपक बडवे, दिलीप ठोकळ, मलिक अर्जुन,अजीमोद्दीन शेख, गनी शेख, सलिम सहारा, संदेश रपारिया, जस्मित वधवा, दत्ता खैरे, गोरख दळवी आदी सहभागी झाले होते.

PARADISE
ART & DISPLAY
ALKOSIGN
WRITING & DISPLAY SYSTEMS
* WHITE BOARD
* PERFORATED BOARD
* ACRYLIC WORK
* NAME PLATES
HAJI IDREES SHAFI SHAIKH
9890524092 / 9028718302
1406-7,Mominpura,Sangamner,
Dist : Ahmednagar

# नियमांचे उल्लंघन झाल्यास कडक कारवाई : जिल्हाधिकारी

दि.११ – कोरोना संसर्ग वाढत असतानाही प्रतिबंधात्मक उपाययोजनांकडे डोळेझाक करणार्यांवर आता कडक कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. विविध मंगल कार्यालये, लॉन्स येथे आता पोलिसांचा खडा पहारा राहणार असून पन्नास पेक्षा जास्त उपस्थिती असल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. त्याबरोबरच शहर व जिल्ह्यातील हॉटेल्सना पन्नास टक्के क्षमतेने चालविण्याची परवानगी दिली असताना तेथेही नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हाधिकारी डॉ. राजेन्द्र भोसले यांनी संबंधितांनाही नियमांची कडक अंमलबजावणी करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. मंगळवारी रात्री मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याशी संवाद साधून कोरोना विषयक परिस्थिती जाणून घेतली. कोरोना संसर्ग रोखण्यासाठी कर्तव्यकठोर होऊन उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.भोसले यांनी जिल्हा आरोग्य यंत्रणा, महानगरपालिका, जिल्हा परिषद, पोलीस यंत्रणेतील वरिष्ठ अधिकार्यांची बैठक घेऊन कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी केलेल्या नियमांची कडक अंमलबजावणीचे आदेश दिले. यावेळी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी राजेन्द्र क्षीरसागर, अपर पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, महानगरपालिका आयुक्त शंकर गोरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुनील पोखरणा, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ, संदीप सांगळे, निवासी उपजिल्हाधिकारी संदीप निचित, जिल्हा सर्वेक्षण अधिकारी दादासाहेब भोसले, महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. वीरेंद्र बडदे आदींची यावेळी उपस्थिती होती. जिल्हाधिकारी डॉ. भोसले म्हणाले, सध्या अहमदनगर शहर आणि जिल्ह्यात कोरोना रुग्णांची संख्या दिवसागणिक वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. ही परिस्थिती आणखी तीव्र होणार नाही, यासाठी नागरिकांनी स्वताहून काही बंधने निश्चितपणे घालून घेणे गरजेचे आहे. आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडा. घराबाहेर पडताना चेहर्यावर मास्क लावा. हात वारंवार धुवा, सार्वजनिक ठिकाणी गर्दी टाळा तसेच गर्दीच्या ठिकाणी जाऊ नका, असे आवाहन त्यांनी केले. सध्या लग्नसराईचे दिवस सुरु आहेत. विविध मंगल कार्यालये, लॉन्स आदी ठिकाणी प्रशासनाने ठरवून दिलेल्या व्यक्तीसंख्येपेक्षा जास्त व्यक्ती असल्याचे दिसून आल्याने प्रशासनाने आता निर्बंधांची कडक अंमलबजावणीच्या सूचना दिल्या आहेत. येत्या १५ मार्चपर्यंत जिल्ह्यात ४४ मंगल कार्यालये, लॉन्स, मॅरेज हॉल आदी ठिकाणी लग्न समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. कोरोना प्रादुर्भाव रोखण्याच्या उपाययोजनांची कडक अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आता या ठिकाणी लग्न समारंभावेळी पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहे. नियमांचे उल्लंघन करणार्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. भोसले यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील हॉटेल्स, फूड कोर्टस, रेस्टॉरंटस, बार आणि तत्सम अनुज्ञप्ती यांना ५० टक्के क्षमतेने ते सुरु करण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र, नियमांचे उल्लंघन करणार्या अशा आस्थापनांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश डॉ. भोसले यांनी पोलीस यंत्रणेला दिले आहेत. शहरी व ग्रामीण भागात काही ठराविक परिसरात सातत्याने रुग्णसंख्या वाढत असल्याचे दिसून येत असेल तर तेथे परिसरातील व्यक्तींच्या हालचालींवर निर्बंध लागू करण्यासाठी कन्टेन्टमेंट झोन तयार करणे आणि नियमांचे उल्लंघन करणार्यांवर कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी महानगरपालिका तसेच सर्व तहसीलदार यांना देण्यात आले आहेत. सध्या जिल्ह्यातील शाळा – महाविद्यालये सुरु आहेत, त्या ठिकाणची किती विद्यार्थी कोरोना बाधित झाले आहेत. यासंदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिका आरोग्यअधिकारी यांनी कोविड रुग्णांच्या चाचण्यांचे पृथ:क्करण करुन तीन दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. अहवालानंतर शाळा आणि महाविद्यालयांसंदर्भात निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील काही रुग्णालयांमध्ये खासगी वैद्यकीय व्यावसायिकांद्वारा फ्ल्यूची लक्षणे असणार्या कोरोना संशयित रुग्णाची आरटीपीसीआर चाचणी न करता एचआरसीटी करुन उपचार केले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे. अशा रुग्णांची आरटीपीसीआर चाचण्या करण्यासंदर्भात संबंधितांना सूचना देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. भोसले यांनी आरोग्य यंत्रणेला दिले

# आगामी अर्थसंकल्पातून शहरविकासाचे प्रकल्प राबवावे- आ.संग्राम जगताप



अहमदनगर : पक्षीय राजकारण बाजूला ठेवून शहर विकासाचे सर्वजण काम करित आहेत. कै.शंकरराव घुले यांनी शहर विकासाला नक्षराध्यक्ष पदाच्या माध्यमातून एक चालना दिली. त्यांच्या विचाराचा वारस अविनाश घुले यांनी पुढे सुरू ठेवला आहे. शंकरराव घुले यांनी हमाल पंचायतच्या माध्यमातून सर्व सामान्याचे प्रश्न मार्गी लावले. सर्वांना बरोबर घेवून काम करण्याची पध्दत आजच्या तरूण पिढीला मार्गदर्शक आहे. स्थायी समितीचे सभापतीपदी मा.श्री.अविनाश घुले यांना सर्व पक्षाच्या नगरसेवकांनी शहर विकासासाठी बिनविरोध निवडून दिले आहे. त्यांनी सर्वांना बरोबर घेवून शहर विकासाच्या कामाला गती दयावी येणारा मनपाचा अर्थ संकल्पामध्ये शहर विकासाचे प्रकल्प राबवावेत असे मत आ. संग्रात जगताप यांनी व्यक्त केले.

# शेतकऱ्यांनी अनुदानाचा लाभ घ्यावा : कर्डिले

अहमदनगर – जिल्हा बॅंक ही केंद्र सरकारच्या योजना शेतकऱ्यांसाठी राबवणारी राज्यातील पहिली बॅंक आहे. कोरोन संकटाच्या काळामध्ये शेतकरी हवाल दिल झाला होता. शेतकऱ्याला आर्थिकमदत व्हावी व तीव्यवसायासाठी लागणारी मदत म्हणून खेळते भांडवलाच्या रूपाने देण्याचे काम मागील संचालक मंडळाने घेतल्यामुळे सर्वात जास्त १२९ कोटी रूपयाचा लाभ नगर तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळाले. केंद्र सरकारच्या उशिरा झालेल्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना वर्षभर लाभ मिळाला नाही. पण मार्च नंतर पशूपालन खेळते भांडवल कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज देण्यासाठी प्रयत्न करणार. मागील वर्षी नगर जिल्ह्याला खरीब व रब्बी पिकासाठी १५००० कोटी रूपयांची कर्ज माफी मिळाली होती. यावर्षी कर्ज माफीसाठी केंद्रसरकारकडे पाठपुरावा करू. केंद्र सरकारने खेळत्या भाडवंलच्या रूपाने शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने मदत करण्याचे काम केले आहे. ३१ मार्च पर्यंत कर्ज वसूली होणे गरजेचे असून शेतकऱ्यांनी खरीब व रब्बी पिकासाठी शुन्य टक्के व पशुपालन खेळते भाडवंलाचे कर्ज भरून केंद्र सरकारच्या ३ टक्के अनुदान मिळावे यासाठी शेतकऱ्यांनी कर्ज भरावे असे प्रतिपादन माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी केले.नगर तालुक्यातील शेतकऱ्यांनी



घेतलेल्या रब्बी, गरीब व पशुपालन खेळते भाडवंल कर्ज वसूली संदर्भातील सचिव व शाखाधिकाराच्या बैठकीत बोलताना माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले समवेत बॅंकेचे कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे, सुधाकर वर्पे आनंदराव शेळके, रामदास सोनवणे, इस्माईल शेख, महादेव कराळे, शैलेश बोधले आदी उपस्थित होते. माजी मंत्री कर्डिले पुढे म्हणाले की, सभासद शेतकरी थकबाकी न केल्यास त्याला केंद्र सरकारच्या योजनेचा लाभ मिळणार नाही व सोसायटी निवडणुकीमध्ये मतदानापासून वंचित राहावे लागेल व जादा दराने व्याज भराव लागेल. यासाठी नक्षर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज मार्च अळेर भरून कारखानदारांना दाखवून द्या की आम्ही प्रामाणिक आहोत. मार्च नंतर पुन्हा कोरोना काळामध्ये शेतकरी अडचणीत आहे. अजूनही कोरोनाचा प्रार्दुभाव वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक मदत व्हावी यासाठी नाबार्डशी सदर योजना पुढे चालू ठेवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. कारखानदार शेतकऱ्यांची वसूली करण्यासाठी नेम लावतात. तेच नेम कारखानदारांना या पुढे लावले जातील. जिल्हा बॅंक ही आता राज्य सरकारच्य ताब्यात नसून रिझर्व बॅंकेकडे गेले आहे बेकायदेशिरच्या नावाखाली कारखानदारांच ठेवायचे झाकून शेतकऱ्यांनी घेतलेल्या खेळते भाडवंल कर्जाची संपूर्ण राज्यात करायची चर्चा. राजकीय पुढाऱ्यांना मतासाठी शेतकरी आठवतात. त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी वेळ नसतो.सचिवांनी व शाखाअधिकारी शेतकऱ्यांना घेतलेल्या कर्जाची सविस्तर माहिती द्यावी व लाभकसा होईल हे सांगावे. जिल्ह्यातीलकारखानदार व प्रस्थापित पुढाऱ्यांनीमला राजकारणातून संपवण्यासाठी खुप प्रयत्न केले.खोट्या नाट्या केसेस केल्या त्यातून बाहेर आलो. जनतेच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी अहोरात्र काम करीत आहे. मला चेक देण्यासाठी जन्माला यायचाय. या सर्वांच्या नाड्या माझ्याजवळ आहे. यांना राजकारणात पुरून उरेल एवढी क्षमता माझ्यात आहे. मी कधीही बेकायदेशीर काम करत नाही.

# वाझे अटकेत; एनआयएची कोठडी

मुंबई : मुकेश अंबानी यांच्या घराजवळ एका गाडीत स्फोटकं सापडली या प्रकरणाचा तपास एनआयए कडून सुरू असून, यात मोठी कारवाई करण्यात आली आहे. एनआयएकडून सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन वाझे यांना अटक करण्यात आली आहे. वाझे यांची शनिवारी सकाळपासून एनआयएकडून चौकशी सुरू होती. १३ तास चाललेल्या चौकशीनंतर वाझे यांना अटक करण्यात आली असून, त्यांनीच अंबानींच्या घराजवळ गाडी उभी केली होती, असा आरोप एनआयएने केला आहे. त्यामुळे या प्रकरणाला आणखी नवीन दिशा मिळाली आहे.



सत्र न्यायालयाने अंतरिम अटकपूर्व जामीनाची याचिका फेटाळून लावल्यानंतर वाझे यांच्यावर एनआयएने कारवाई केली आहे. शनिवारी राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) सकाळपासून वाझे यांच्याकडे चौकशी सुरु केली.अंबानी यांच्या निवासस्थानाजवळ स्फोटके ठेवलेली स्कॉर्पिओ कार मनसुख यांच्या ताब्यात होती. त्यामुळे मनसुख यांची हत्या आणि त्यांच्या कारची चोरी ही प्रकरणे एकाच गुन्ह्याचे पैलू असल्याने एनआयएने दोन दिवसांपूर्वी हिरेन कुटुंबाकडून माहिती घेतली. शनिवारी तब्बल १३ तास चाललेल्या चौकशीनंतर एनआयएने सचिन वाझेला अटक केली. वाझे यांना अटक केल्यानंतर एनआयए न्यायालयासमोर हजर केलं जाणार आहे. मुंबईतील न्यायालयासमोर वाझे यांना कोठडी देण्याची मागणी एनआयए कडून करण्यात आली.एनआयएची मागणी मंजूर करत न्यायालयाने २५ मार्चपर्यंत कोठडी सुनावली आहे. निलंबनाच्या काळात सचिन वाझे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर त्यांना पक्षाचे प्रवक्ते म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्यामुळे ते एकप्रकारे शिवसेनेचे पूर्णवेळ कार्यकर्त्ये म्हणूनच काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. मनसुख हिरेन बाबत त्यांचा सहभाग पूर्णपणे दिसत असतानाही राज्याचे गृहमंत्री, मुख्यमंत्री त्यांना पाठिशी घालत होते. अशा प्रकारामुळे महाराष्ट्र पोलिसांची बदनामी होत असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या घराजवळ गुरुवारी (२५ फेब्रवारी) मध्यरात्री दोनच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी स्कॉर्पिओ कार बेवारस अवस्थेत सोडली होती. या कारमध्ये सुमारे अडीच किलो वजनाच्या जिलेटीनच्या कांड्या आढळून आल्यानं सगळ्यांनाच धक्का बसला होता. 'मुंबई इंडियन्स' लिहिलेल्या बॅगेत अंबानी कुटुंबीयांना धमकी देणारी चिठ्ठीही सापडली. या संपूर्ण प्रकरणात स्कॉर्पिओसह इनोव्हा कार सहभागी होती. यापैकी स्कॉर्पियो कार १७ फेब्रुवारीच्या रात्री मुलुंड उड्डाणपुलाजवळून (ऐरोलीकडे जाणाऱ्या मार्गावरील) चोरण्यात आली. तर इनोव्हा कारवरील नोंदणी क्रमांक बनावट असल्याचे स्पष्ट झाले होतं. दरम्यान ही इनोव्हा कार सापडली असून, शनिवारी रात्री एनआयएच्या कार्यालयात आणण्यात आली.

# व्यापारी हिरण यांची हत्या पैशांसाठीच

अहमदनगर (प्रतिनिधी)– बेलापूर येथील व्यापारी गौतम हिरण यांच्या हत्येप्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी पाच जणांना नाशिक जिल्ह्यातून विविध ठिकाणाहून अटक केली. दरम्यान, या गुन्ह्यात पोलिसांनी अन्य दोघांना यापूर्वीच अटक केली आहे. पैशावरूनच हिरण यांची हत्या केल्याचे प्राथमिक तपासात पुढे आले आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक मनोज पाटील यांनी आज श्रीरामपूर येथे पत्रकार परिषदेत दिली. संदीप मुरलीधर हांडे (वय २६ रा. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक), जुनेद शेख (वय २५, रा. सप्तश्रृंगीनगर, नायगाव रोड, सिन्नर, जि. नाशिक), अजय राजू चव्हाण (वय २६, रा. पास्तेगाव, मारुती मंदिरासमोर, सिन्नर, जि. नाशिक), नवनाथ धोंडू निकम (वय २९ रा. उक्कडगाव, ता. कोपरगाव, जि. नगर) व एक २२ वर्षीय आरोपीचा गुन्ह्यात समावेश आहे. १ मार्च २०२१ रोजी बेलापूर (ता श्रीरामपूर) येथील व्यापारी गौतम झुंबरलाल हिरण दुकान बंद करून सायंकाळी सात वाजता श्रीरामपूरला जाण्यासाठी निघाले असता कोणीतरी अज्ञात व्यक्तींनी त्यांचे अपहरण केले होते.

## "महाराष्ट्रात सरसकट लसीकरणाला परवानगी मिळावी" :उद्योजक आनंद महिंद्रा



राज्यात पुन्ह एकदा कोरोनाचा संसर्ग वाढत आहे, त्यामुळे उपस्थितीची ५० टक्के अट लागू करत राज्य शासनाने कठोर निर्बंध जाहीर करण्यात आले आहेत. अशा पार्श्वभूमीवर पंतप्रधान कार्यालय आणि केंद्रीय आरोग्य मंत्री हर्षवर्धन राठोड यांच्याकडे उद्योजक आनंद महिंद्रा यांनी महाराष्ट्रात सरसकट लसीकरणाला परवानगी मिळावी, अशी इच्छा व्यक्त केली आहे.आनंद महिंद्रा यांनी ट्विटरवरून पीएमओ आणि केंद्रीय आरोग्यमंत्री यांना टॅग करत वरील आशयाचे ट्विट केले आहे. आनंद महिंद्रा म्हणाले की, महाराष्ट्र हे आर्थिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचे असून कोरोना बाधितांचा वाढत आकडा पाहता किमान महाराष्ट्रातपुरते तरी सरसकट लसीकरणाला परवानगी द्यावी, अशी मागमी त्यांनी केली आहे.दररोज सापडणाऱ्या नव्या रुग्णांपैकी अर्ध्याहून अधिक रुग्ण महाराष्ट्रातील आहेत. महाराष्ट्र राज्य हे देशाच्या आर्थिक क्षेत्राच्या केंद्रस्थानी आहे. आणखीन लॉकडाउन राज्याला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करणारे ठरतील. त्यामुळेच ज्यांना ज्यांना लस घेण्याची इच्छा आहे अशा सर्वांना लसीकरणाची तातडीची परवानगी देण्याची गरज महाराष्ट्रात आहे. लसींची कमतरता नाहीय असेही ट्विट त्यांनी केले आहे.




कभी यूँ भी आ मेरी आँख में के मेरी नज़र को खबर न हो
मुझे एक रात नवाज़ दे मगर उसके बाद सेहर न हो
बशीर बद्र

# वाझेच्या अटकेमुळे आणखी बरेच बाहेर येईलः देवेंद्र फडणवीस



मुंबई : अंबानी यांच्या घराबाहेर आढळून आलेल्या स्फोटकप्रकरणी पोलिस अधिकारी सचिन वाझे यांच्या अटकेमुळे सध्या अर्धे सत्य बाहेर आले असून आणखी बरेच काही सत्य तपासात उघड होईल असे सूचक वक्तव्य विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुण्यात प्रसार माध्यमांशी ते बोलत होते. स्फोटक प्रकरणी मनसुख हिरेन यांचा मृत्यूदेह आढळून आल्यानंतर या प्रकरणात काही तरी काळंबेरं असल्याचे दिसून आले. तसेच याप्रकरणी सचिन वाझे यांचा सहभाग असल्याचे अनेक गोष्टींवरून आढळून येत आहे. याप्रकरणात आणखी बऱ्याचगोष्टी बाहेर येणार असून या सर्व गोष्टी एका विशिष्ट व्यक्तींकरीता केल्याचे दिसून येत असल्याचे तेम्हणाले. सचिन वाझे यांना मुंबई उच्च न्यायालयाने निलंबित केले होते. आमचं सरकार होतं त्यावेळी त्यांच्याबाबतची माहिती आपण घेतली होती. परंतु त्यावेळी न्यायालयाने त्यांना निलंबीत केल्याने पुन्हा रूजू करून घेता येणार नसल्याचा अभिप्राय मिळाल्यानंतर आम्ही त्याबाबत विचार केला नाही. मात्र त्यानंतर या नव्या आलेल्या सरकारने त्यांना पुन्हा सेवेत घेतल्याचे सांगत वाझेंना रूजू करून घेतल्यानंतर तेथील क्राईमच्या पीआयला हटवून त्या सर्व केसेस त्यांच्याकडे सुपुर्द करण्यात आल्याचे फडणविसांनी सांगितले.

# स्व.अनिलभैय्या राठोड यांना नगरकर कधीही विसरू शकत नाहीत

## कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे



अहमदनगर : स्व.अनिलभैय्या राठोड हे सर्वसामान्य नगरकरांचे कैवारी होते. त्यांनी दीनदुबळ्यांना त्याचबरोबर समाजातील सर्व घटकांना सतत न्याय द्यायचा प्रयत्न त्यांच्या हयातीत केला. त्यामुळे त्यांना सर्वसामान्य नगरकर हे कधीही विसरू शकत नाहीत, असे प्रतिपादन शहर कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी केले आहे.स्व.अनिलभैय्या राठोड यांच्या जयंती दिनानिमित्त शिवालय येथे जाऊन त्यांच्या स्मृतीस अहमदनगर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने शहर कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी अभिवादन केले. यावेळी शिवसेना नेते विक्रमराठोड, ब्लॉक कॉंग्रेस अध्यक्ष मनोज गुंदेचा, शहर जिल्हा उपाध्यक्ष अनंतराव गारदे, शहर जिल्हा खजिनदार मोहनराव वाखुरे, क्रीडा कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष प्रवीण गीते पाटील, लोकेश बर्वे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना किरण काळे म्हणाले की,स्व.अनिलभैय्या हे सर्वसामान्य नागरिकांच्या मदतीला रात्री–अपरात्री धावून जायचे. जनतेला त्यांच्या विषयी विश्वास होता की आपण नेलेली समस्या ही नक्कीच त्यांच्या हातून सुटेल. नगरकरांना संरक्षण देण्याची त्यांनी घेतलेली भूमिका आजही नगरकरांच्या स्मरणात आहे.

# बाबा जाधव यांना मातृशोक



नगर - शहरातील माळीवाडा परिसरातील रहिवासी श्रीमती पारूबाई नारायण जाधव यांचे अल्पशा आजाराने दि. 16 सकाळी सात वाजता निधन झाले. मृत्यु समयी त्या 77 वर्षांच्या होत्या. त्यांच्यावर आज दुपारी नालेगाव येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. पारूबाई यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, पुतणे, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक अहमदनगर घडामोडीचे कार्यकारी संपादक बाबा जाधव यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

# जिल्हा बँकेत ट्रेलर, तर पालिकेत पिक्चर दाखवू

जामखेड, (प्रतिनिधी) – जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत जामखेड बिनविरोध काढले. तर कर्जतच्या निवडणुकीत त्यांनी ४५ ठराव असलेले घेऊन गेले पण मतमोजणीत ३६ कसे झाले हे कोडे त्यांना अजून उमजलेले नाही. म्हणून जिल्हा बँक ट्रेलर आहे. आगामी नगरपरिषद निवडणुकीत पिक्चरदाखविणार आहे, असा टोला खासदार सुजय विखे यांनी आमदार रोहित पवार यांना नाव न घेता लगावला आहे. भाजप कार्यकर्त्यांचा स्नेहमेळावा व नवनिर्वाचित जिल्हा बँकेचे संचालक अमोल राळेभात यांचा सत्कार कार्यक्रमात खासदार विखे बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते, जिल्हा बँकेचे माजी जगन्नाथराळेभात, विठ्ठल राऊत, भाजप तालुकाध्यक्ष अजय काशीद, युवक अध्यक्ष शरद कार्ले, शहराध्यक्ष बिभीषण धनवडे, प्रा.अरूण वराट, नगरसेवक अमित चिंतामणी, ज्ञानेशर झेंडे, सुधीर राळेभात, रवींद्र सुरवसे, बापूराव ढवळे, सलीम बागवान, विनोद बेलेकर, सोमनाथ राळेभात, ॲड. प्रवीण सानप, भरत काकडे, किसन ढवळे, मकरंद काशीद उपस्थित होते. खासदार विखे म्हणाले, राज्यातील जेवढे खासदार आहेत. त्यांच्यापेक्षा जास्त निधी मी केंद्र सरकार कडून मतदारसंघासाठी आणला आहे. पण प्रसिद्धी केली नाही. परंतु येथील आमदार हा निधी मी आणला असे सोशल मिडियावर सांगत आहेत . जे काम आपण केले नाही, त्याचे श्रेय घेऊ नये याबाबत मी जनतेत जाऊन निधी आणल्याचे सांगणार आहे. तालुक्याचे आमदार हे दबावाचे व धाकटपशा दाखवून कसे राजकारण करीत आहे याचीमला जाणीव आहे पण त्यासाठी त्यांना उत्तर देण्यासाठी निवडणूक होणे गरजेचे होते. जिल्हा बँकेच्या माध्यमातून आम्ही ते त्यांना दाखवून दिले आहे. माजीमंत्री राम शिंदे यांनी केलेल्या कामाचे उदघाटन ते करीत आहेत. या वेळी खासदार निधीतून जामखेड तालुक्याला दिलेल्या अँम्बुलन्सचे लोकार्पण सोहळा विखे यांच्या हस्ते झाला.

साप्ताहिक दर्शक

IF UNDELIVERED PLEASE RETURN TO
DARSHAK
DARSHAK BHAVAN,
726,OPP.DEPALI
THEATER ZENDIGATE,
AHMEDNAGAR-414001
MAHARASHTRA

e-mail - weeklydarshak@gmail.com

R.N.I. NO.
MAH/MAR/2000/02266
POSTAL REGD.NO.
ANR/068/2018-2020

TO,